1/ 21/4

## कायम विना अनुदान तत्वावरील प्राथमिक शाळा परवानगीचे आदेश.

### महाराष्ट्र शासन

क्रमांक: नप्राशा- २००६/(३१८/२००६)/प्राशि -३
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक २४ सप्टेंबर, २००८

24. Sep. 2008

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक,
पुणे

**विषय : सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देणेबाबत.**

सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात नविन प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी मिळण्याकरीता शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे तसेच स्थानिक गरज लक्षात घेऊन अंजूमन इस्लाम शिक्षण संस्था, पुणे संचलित बी.एन.डी.एम, टी.एम.प्राथ.शाळा, जि.पुणे या संस्थेच्या इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस जि. पुणे या ठिकाणी सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) कायम विना अनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही, या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास "जून २००५" पासून शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर परवानगी शासनपत्र क्रमांक : व्हीएलएस २०००/(५०९/२०००)/(१)/प्राशि-३, दिनांक २१ जुलै, २००० मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

३. याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच शासनपत्र दिनांक २१ जुलै, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

४. प्राथमिक शाळेस शासन परवानगीचे आदेश कळविण्यापूर्वी ज्या ठिकाणी शाळेला परवानगी द्यावयाची आहे त्या ठिकाणी निवडणूक आचारसंहिता लागू आहे किंवा कसे याबाबतची खात्री विभागीय

2 21/4

शिक्षण उपसंचालक यांनी संबंधित जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी /जिल्हाधिकारी यांचेकडून घेऊन त्याची खात्री करुन मगच परवानगीचे आदेश संबंधित संस्थेस कळविण्यात यावेत. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

(सुरेश पेडगांवकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :- माहिती व तात्काळ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे.
३) मा. शालेय शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा. शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५) मा. सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक / निवड नस्ती- प्राशि-३

Head Teacher
Anjuman-I-Islam's
Ahmed Peermohamed Eng. Med.
Pre-Primary & Primary School
Pune-411 001.

Recd
28.9.08
at 12.35

Recd.
1/10/08